# मराठी (प्रश्न-पत्र–II)

( साहित्य )

| वेळ : तीन तास | कमाल अंक : 250 |
|---|---|

## प्रश्नपत्रिकेबाबतच्या ठळक सूचना

**उत्तरपत्रिका लिहिण्यापूर्वी कृपया पुढील सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात**

**आठ** प्रश्नांची विभागणी दोन भागांमध्ये केलेली आहे.

उमेदवाराला एकूण **पाच** प्रश्न सोडवावयाचे आहेत.

प्रश्न क्रमांक **1** आणि **5** हे अनिवार्य आहेत. आणि उर्वरित प्रश्नांपैकी **तीन** प्रश्न सोडवताना प्रत्येक विभागातील किमान **एक** तरी प्रश्न सोडवणे आवश्यक आहे.

प्रश्नासमोर गुण दिलेले आहेत.

मराठीतच उत्तरे लिहावीत.

ज्या प्रश्नांमध्ये शब्दमर्यादा उल्लेखलेली असेल, त्याचे कटाक्षाने पालन करावे.

प्रश्नांच्या क्रमानुसारच प्रश्न सोडवावेत. प्रश्न सोडवत असताना उत्तरातील काही भाग लिहिण्याचा राहिल्यास किंवा उत्तरपत्रिकेतील एखादे पान कोरे सोडल्यास तेथे काट मारावी.

munotes.in

# MARATHI (PAPER—II)

( LITERATURE )

| Time Allowed : Three Hours | Maximum Marks : 250 |
|---|---|

## QUESTION PAPER SPECIFIC INSTRUCTIONS

**Please read each of the following instructions carefully before attempting questions**

There are EIGHT questions divided in two Sections.

Candidate has to attempt FIVE questions in all.

Question Nos. **1** and **5** are compulsory and out of the remaining, THREE are to be attempted choosing at least ONE question from each Section.

The number of marks carried by a question/part is indicated against it.

Answers must be written in MARATHI.

Word limit in questions, wherever specified, should be adhered to.

Attempts of questions shall be counted in sequential order. Unless struck off, attempt of a question shall be counted even if attempted partly. Any page or portion of the page left blank in the Question-cum-Answer Booklet must be clearly struck off.

## SECTION—A

**1.** पुढील पाच उत्ताऱ्यांचे प्रत्येकी *150* शब्दांत रसास्वादपूर्वक विवेचन करा : 10×5=50

*(a)* एक वेळ एके ब्राह्मणे भटोबासाते पूसीले: ''हा भटो तुमचि मुर्ति झळझळीत दिसत असेः तरि तुम्ही काइ त्रीकाळ स्नान करीता?'' तंवं भटोबासी म्हणीतलें: ''पंचवीस वरूषे भिक्षेसी जाली: परि तै लागौनि उष्णवणी आन सीतलवणी: आंगी लावीली नाही.'' तंवं तेणे म्हणीतलें: ''तरि हें कैसे भटो?'' भटोबासी म्हणीतलें: ''गगनी तारांगणें झळझळीत दिसति: ते काइ तयांचें मंदिर झळकताए: किं आतौल आहे तें झळकताए?'' भटोबासी म्हणीतलें: ''तैसे माझीया राजमंदिरामध्ये वस्तु आहे: ते क्रीडताए: म्हणौनि माझी मुर्ति झळझळिताए:''॥

*(b)* विश्वासला चार महिने सक्त मजुरीची शिक्षा झाली. त्यानं ती मुकाट्यानं ऐकली शिक्षेच्या अवधीत त्यानं इकडंतिकडं पाहिलं नाही. स्वतःसाठी कोणतीच सवलत मागितली नाही. शारीरिक कष्ट जणू तो स्वेच्छेनं करीत होता. त्यानं कसलीच कसूर केली नाही. भोवताली बघणं आणि विचार करणं एवढंच काम जणू तो करीत होता. त्यामुळं त्याची प्रकृती बरीच सुदृढ झाली. तो बाहेर आला तेव्हा शांत डोळ्यांनी बाहेरच्या जगाकडं बघू लागला. आपल्या घराशी आला तेव्हा त्याला जाणवलं की अरे! आपण आपल्या घरासमोर उभे आहोत!

*(c)* काम मातीचे व माती कामांची कारण शेवटी माणूसही मातीच व मातीच माणूस व माणसापेक्षा श्रेष्ठ. कारण मातीच जगवतेना साऱ्या प्राण्यांना, माणसांना. आपले सारे कष्ट उपसून व स्वतः झिजून म्हणूनच ती काळी माती व तिच्या धनावर पोसले जाणारे आम्ही सारे तिचेच धन आरंभापासून ते शेवटपर्यन्त.

*(d)* बाटे तुज मृगया। ही का?
समजसि जग जणुं। जंगल सारें,
आणिक स्त्रीजन। वन्य पशु कां?
बघुनि मृगातें। कस्तुरी मिळते,
लाभे तैशी। प्रीति कधीं का?

*(e)* मुलाचे हे कानाचे पडदे फाडणारे कराल क्रंदन ऐकून म्हातारा रडू लागला. थरथरू लागला. त्याच्याकडे दिनवाण्या नजरेने पाहू लागला; आणि बापाचे अश्रू आणि त्याच्या अंगाचा चाललेला कंप पाहून जयचंद खाली बसला. त्याची छाती चोळू लागला. डोळे पुसू लागला. आणि त्याच्या स्वच्छ सुकुमार बोटांतील प्रेम पाहून म्हाताऱ्याने त्याचे डोके ओढून आपल्या छातीवर ठेवले. ते तो गोंजारू लागला आणि गेल्या दोन-चार-पाच वर्षांपासून घरात असूनही मानसिक दृष्ट्या एकाकी झालेला जय पितृसुखाचे सुख घेत तसेच डोके ठेवून बसला. उन्हात जळणारे शेत जसे कोसळणारा पाऊस पिऊन सुगंधू लागते, फुलू लागते, तसा तोही स्नेहस्निग्ध होऊन सुगंधू लागला.

munotes.in

**2.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

*(a)* 'स्मृतिस्थळ' या ग्रंथात यादवकालीन सामाजिक, राजकीय, ऐतिहासिक आणि सांस्कृतिक जीवनसंदर्भ सहजभावाने साकारलेले दिसतात, साधार लिहा. 15

*(b)* 'शेतकऱ्याचा आसूड' या ग्रंथात शेतकऱ्यांच्या स्थितिगतीचे जे चित्रण आढळते ते सार्वकालिक ठरणारे आहे, हे विधान सोदाहरण स्पष्ट करा. 15

*(c)* 'ब्राह्मणकन्या' या कादंबरीतील आशयविषयाची सामाजिकतेच्या अंगाने चिकित्सा करा. 20

**3.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

*(a)* 'साष्टांग नमस्कार', हे एक प्रयोगशील-व्यावसायिक नाटक आहे, या विधानाची सोदाहरण चर्चा करा. 15

*(b)* 'बाबुराव बागुलांची कथा सामाजिक, आर्थिक या दोन्ही अंगांनी नाडलेल्यांचे भावविश्व साकारते' हे मत 'जेव्हा मी जात चोरली होती' मधील कथांच्या आधारे स्पष्ट करा. 15

*(c)* 'शिळान' कथासंग्रहातील स्त्रियांच्या अनेकस्तरीय जीवनसंघर्षाचे स्वरूप सोदाहरण विशद करा. 20

**4.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

*(a)* 'जन हे वोळतु जेथे' या कादंबरीतील पात्रचित्रणाचे स्वरूप साधार लिहा. 15

*(b)* 'आठवणींचे पक्षी' या आत्मकथनाची वैशिष्ट्ये उदाहरणे देऊन नमूद करा. 15

*(c)* ''लग्नसंस्थेची सर्वांगीण चिकित्सा 'एकेक पान गळावया' या संग्रहातील कथांमधून झालेली आढळते'', या मताची यथार्थता पटवा. 20

munotes.in

## SECTION—B

**5.** पुढील पाच उताऱ्यांचे प्रत्येकी *150* शब्दांत रसास्वादपूर्वक विवेचन करा : 10×5=50

*(a)* हडबडलीं पातकें। घेता रामनाम एकें॥
नाम घेतां ततक्षणीं। चित्रगुप्तें सांडिली लेखणी॥
घेऊनि पूजेचा संभार। ब्रह्मा येतसे समोर॥
नामा म्हणे जरी हे लटकें। तरी छेदावें मस्तक॥

*(b)* ऐक राया तूं थोर दयासिंधू। नीतिसुंदर तूं, तूंचि दीनबंधू॥
निखंदूनी बोलिलों नको मंदूं। सकल-वंदनीय पाय तुझे वंदूं॥
पारधीमाजी खगा मृगाराजे। करिति हिंसा जे ते बरीच साजे॥
तुवां दिधली मज मोकळीकगाजे। दया केली हे कीर्ति तुझी गाजे॥
हंस मिळणेच कठीण महीलोकी। सोनयाचा तो नवल हें विलोकीं॥
तशा मजलाही सोडिलें तुवा की। तुझा ऐसा उपकार मी न झांकीं॥

*(c)* भिंत खचली, कलथून खांब गेला,
जुनी पडकी उद्ध्वस्त धर्मशाला;
तिच्या कौलारीं बसुनि पारवा तो
खिन्न नीरस एकांतगीत गातो.

(d) प्रासाद भिडूं द्या गगनाला गर्वांत
डोलुं द्या पताका सत्तेच्या उन्मत्त
दौलती उठू द्या प्राशुनि दुर्बळ रक्त
कोसळेल इमला समूळ अेकारातीं
मातीवर चढणें अेक नवा थर अंती!

(e) या चवताळलेल्या भूकिस्तांच्या झुंडी
कुणीकडून आल्या कुठे निघाल्या?
या शहराच्या चौकाचौकात उभारलेले
क्रांतिकारकांचे पुतळे उखडून कुठे गेल्या?

**6.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) नामदेवांच्या अभंगांतून वत्सल आणि करुण हे दोन्ही रस अभिव्यक्त झाले आहेत, कसे ते सोदाहरण लिहा. 15

(b) 'नारायण सुर्वे यांच्या कवितांमधून प्रकटलेले आशय-विचारविश्व वास्तवाभिमुख आहे' या विधानातील सत्यासत्यता 'जाहीरनामा'च्या आधारे स्पष्ट करा. 15

(c) 'शाहिरी काव्य महाराष्ट्राच्या राजकीय व सामाजिक जीवनाचे प्रतिबिंब आहे' हे विधान 'पैंजण'च्या आधारे पटवून द्या. 20

**7.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) 'रघुनाथ पंडिताची वर्णनशैली ही श्रेष्ठ दर्जाची होती', हे मत 'दमयंती स्वयंवर'च्या आधारे स्पष्ट करा. 15

(b) 'उदासिनता हा बालकवींच्या कवितांचा मुख्य स्वर आहे' या विधानाची यथार्थता पटवा. 15

(c) ग्रेस यांच्या 'संध्याकाळच्या कविता' मधील प्रतिभासृष्टीचे स्वरूप साधार उलगडून दाखवा. 20

**8.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) 'विशाखा' मध्ये सामाजिक व राजकीय जीवनजाणिवा कशा व्यक्त झाल्या आहेत ते सोदाहरण लिहा. 15

(b) नामदेव ढसाळांच्या कवितांमधून आविष्कृत झालेला अनुभव व्यामिश्र स्वरूपाचा आहे हे मत 'या सत्तेत जीव रमत नाही' मधील कवितांच्या आधारे स्पष्ट करा. 15

(c) 'मृद्‌गंध' या काव्यसंग्रहाच्या आधारे विंदा करंदीकरांच्या प्रतिभेची विविधता साधार विशद करा. 20

★★★

munotes.in